CMYK

आरोग्य विशेष...

>>पान 2

वय वर्षे ८१, अर्ध्या शरीराला लकवा, आजोबांनी जे केलं त्याला तुम्हीही कराल सलाम!
>>पान 3

तिरंगी लढतीत कोण मारणार बाजी; तर्क वितर्कांना उधाण
>>पान 4


# दैनिक आपला विदर्भ

सुविचार
सकारात्मक विचारांनीच आपले जीवन साकारते.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 102 ■ गुरूवार, दि. 21 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




एका मतासाठी काहीही...
VOTE करायला मतदान केंद्रावर अशी पोहोचली जुई गडकरी
आतील पान

## मुख्यमंत्र्यांनी कुटुंबियांसोबत बजावला मतदानाचा हक्क!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आज सकाळी सात वाजल्यापासून राज्यभरात विधानसभा निवडणुकीचे मतदान प्रक्रिया पार पडत आहे. लोकांपासून अनेक मोठे कलाकार, नेते मंडळींनी मतदानाला सुरुवात केली आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील आपल्या कुटुंबियांसोबत मतदानाचा हक्क बजावला आहे.

## बिटकॉईन घोटाळ्यावरुन भाजपाकडून सुप्रिया सुळे, नाना पटोलेंवर आरोपबाजी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात आत विधानसभेसाठी मतदान होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येलाच भाजपकडून सुप्रिया सुळे तसेच नाना पटोले यांच्यावर आरोपबाजी करण्यात आली आहे. पुण्याचे माजी पोलीस अधिकारी रवींद्र विकास यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर परकीय चलन वापरणे तसेच आर्थिक व्यवहारांसाठी बिटकॉईनचा वापर केल्याचा आरोप केला आहे. भाजपचे खासदार तसेच प्रवक्ते सुंधाशू त्रिवेदी यांनी मंगळवारी रात्री ही पत्रकार परिषद घेतली होती. यादरम्यान हे आरोप करण्यात आले. तसेच त्यांनी पुरावे म्हणून कॉल रेकॉर्ड्स आणि व्हॉट्सअॅप चॅटचे स्क्रीनशॉटही सादर केले. भाजपने मंगळवारी पत्रकार परिषद घेत पटोले आणि सुळे यांच्यावर आरोपबाजी केली. सुप्रिया सुळे आणि पटोले यांनी परकीय चलनाचा वापर करत मतदानावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचेही म्हणाले. दरम्यान, भाजपने केलेले हे आरोप सुप्रिया सुळे यांनी फेटाळून लावले आहेत. तसेच केलेल्या आरोपाविरोधात न्यायालयात दाद मागणार असल्याचे सुळे म्हणाल्या.

## मतदान केंद्राबाहेर सापडले लॅपटॉप आणि राऊटर, पोलीस करतायत चौकशी

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान सुरू असतानाच नवी मुंबईत नेरूळमध्ये एका गाडीत संशयास्पद वस्तू आढळून आल्यानं खळबळ उडाली होती. या प्रकरणी आता मोठा खुलासा झाला आहे. नेरूळमधील शिवाजी नगर परिसरात मतदान केंद्राबाहेरच एका गाडीत लॅपटॉप, जॅमरसारखे साहित्य आढळले होते. मतदान मशीन हॅक करणारी यंत्रणा असावी या संशयावरून तुर्भे पोलिसांनी गाडीसह एकाला ताब्यातही घेतलं होतं.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्राच्या परिसरात कडेकोड बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. नेरुळमध्ये शिवाजीनगर परिसरात एका गाडीत काही संशयास्पद हालचाली आढळून आल्या. गाडीची तपासणी केली असता लॅपटॉपसह इतर साहित्य सापडले. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी केली असता मोबाईलमधील चीप टेस्ट करण्याचं हे काम असल्याचं सांगण्यात आलं. ही सर्व यंत्रणा टेस्टिंगसाठीची असल्याचं संबंधित कर्मचाऱ्याने सांगितले.




# सातही मतदारसंघात उत्साहात मतदान; जिल्ह्यात अंदाजे ७०.३५ टक्के सरासरी मतदान

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सातही मतदारसंघात भारत निवडणूक आयोगाने सकाळी सात ते सायंकाळी सहापर्यंत मतदानाची वेळ निश्रि्चत केली होती. त्यानुसार सकाळी सात वाजतापासूनच मतदारसंघात मतदानाला उत्साहात सुरुवात झाले. मतदारांनी मतदानाची टक्केवारी वाढवून शासकीय जनजागृतीला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद देत सातही मतदारसंघात प्राप्त आकडेवारीनुसार अंदाजे सरासरी ७०.३५ टक्के मतदानाची नोंद झाली.

लोकशाहीचा उत्सव असलेल्या निवडणूकीत मतदान करताना

## ■ जेष्ठ व दिव्यांग मतदारांनी सुविधांचा लाभ घेत केले मतदान ■ २३ नोव्हेंबरला मतमोजणी

बुलढाणा जिल्ह्यातील मतदारसंघात मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. मतदारसंघात उत्सवात मतदारराजाने सक्रीय सहभाग घेत मतदान केले. मतदानाला ग्रामीण भागात तर शहरी भागातही मतदारांनी घराबाहेर पडून मतदानासाठी रांगा लावत भरभरुन प्रतिसाद मिळाला.



निवडणूक मतदारा ने मागील विधानसभा निवडणुकीपेक्षा मतदान जास्त प्रमाणात करुन प्रशासनाने केलेल्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद दिलया मुळे मतदानाच्या टक्केवारीमध्ये वाढ झाली. दिलेल्या या प्रतिसादामुळे जिल्ह्यात उत्साहात मतदान पार पडले. जिल्हा अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी प्रशासकीय इमारतीमधील जिल्हा माहिती कार्यालयाच्या मतदान केंद्रात मतदानाचा हक्क बजावला. येथील मतदान केंद्रावरील सोईसुविधाविषयी माहिती जाणून घेतली.

जिल्हा प्रशासनाने यावेळी दिव्यांग मतदारांसाठी विशेष सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे दिव्यांग मतदारांनी सुविधांचा लाभ घेत उत्साहात मतदान केले. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी एक महिला व दिव्यांग मतदान केंद्र स्थापित करण्यात आले होते. तसेच युवासाठी प्रत्येक मतदारसंघात प्रत्येकी सहा मतदान केंद्र ठेवण्यात आले होते. तसेच मतदान केंद्रावर दिव्यांगांकरिता सक्षम पच्या माध्यमातून व्हीलचेअर आणि मतदान केंद्रावर नेण्या-आणण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. सर्व मतदान केंद्रावर मतदार यादीत नाव शोधण्यासाठी मतदान यादी, पिण्याचे पाणी, दिव्यांग व जेष्ठ व्यक्तींसाठी व्हीलचेअर, सावलीचा मंडप, बैठक व्यवस्था, स्वच्छतागृह आदी व्यवस्था जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली होती.

### विधानसभा मतदारसंघनिहाय झालेले मतदान

मतदानाची विधानसभा मतदारसंघनिहाय अंतिम टक्केवारी याप्रमाणे : मलकापूर विधानसभा मतदारसंघात ७०.७५, बुलढाणा विधानसभा मतदारसंघात ६२.१५, चिखली विधानसभा मतदारसंघात ७१.६८, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात ७०.०५, मेहकर विधानसभा मतदारसंघात ६८.८०, खामगांव विधानसभा मतदारसंघात ७६, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात ७३.०१ असे अंदाजे एकूण ७०.३५ टक्के सरासरी मतदान झाले.

## मतदारांना निवडणूक केंद्रांवर नेण्यासाठी कार्यकर्त्यांची कसरत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मतदारराजाला मतदान केंद्रांवर नेण्यासाठी सर्वच पक्षाचे कार्यकर्ते कसरत करताना दिसत आहेत. विशेष करून वयोवृद्ध मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यात आली होती. निवडणूक आयोगाकडूनही मतदान केंद्रांवर वृद्ध, अपंगांसाठी व्हिलचेअरची व्यवस्था करण्यात आली होती.

मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्ते धावपळ करताना दिसत होते. यावेळी मतदारांची ने-आण करण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. विशेष करून ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध मतदारसंघांमध्ये विशेष वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. मतदारांपर्यंत पोहोचून त्यांना मदतान केंद्रांवर घेऊन जाण्यासाठी कार्यकर्ते धावपळ करीत होते. खासगी कंपनीतील नोकरदारांनी सकाळीच मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर अधूनमधून मतदारांची वर्दळ सुरू होती. मतदान केंद्रांवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सर्वत्र मिश्र मतदारांना केंद्रापर्यंत पोहोचवण्यासाठी टॅक्सी व वाहनांचा वापर करण्यात येत होता. वरळीत वयोवृद्धांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठी वेगळ्या ई-बाईकचा महिला कार्यकर्त्या वापर करीत होत्या. तसेच वयोवृद्ध नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत नेताना ई-वाहनांचाही वापर होत होता. वरळी परिसरात महापालिकेच्या पर्यटन वाहनातूनही वयोवृद्ध मतदारांची मतदान केंद्रांपर्यंत ने-आण केली जात होती. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक मतदार व दिव्यांग मतदार यांना मतदान केंद्रावर ने-आण करण्याकरिता बेस्ट उपक्रमाच्या विशेष बसगाड्या, व्हीलचेअर, व्हीलचेअर व्हॅन, दिव्यांग सुलभ बसेस, ईको व्हॅन, टॅक्सी, अशी वाहने उपलब्ध करण्यात आली होती. ज्या ठिकाणी अरुंद रस्त्यांवर बस जाणार नाही, अशा ठिकाणी प्रत्येक मतदारसंघनिहाय दिव्यांगांच्या संख्येनुसार टॅक्सी, इको व्हॅन उपलब्ध करण्यात आली होती. याशिवाय मतदान केंद्रात व्हील चेअरवरही वापर करण्यात येत होता.

## सरकारकडून अपेक्षा करायच्या असतील तर आधी मतदान करा

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** ''मतदान हा लोकशाहीचा उत्सव तर आहेचं, आपलं कर्तव्य देखील आहे. आपला अधिकार आहे. आज कुटुंबासोबत मतदान केलं आहे. महाराष्ट्रातील सर्व बंधू-भगिनींना, महाराष्ट्रातील जनतेला आवाहन आहे, सर्वांनी मतदान करा. लोकशाहीत सरकारकडून आपण अपेक्षा ठेवतो, त्या अपेक्षा ठेवत असताना जो मतदान करतो त्याला जास्त अपेक्षा ठेवण्याचा जास्त अधिकार आहे. आपल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वांनी मतदान करावं,'' असं आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.



''लोकसभा निवडणुकीच्या वेळी याद्यांमध्ये घोळ होता. तो काही प्रमाणात दूर झालेला आहे. वोटिंग सिस्टीम लोकसभेत स्लो होती, त्याच्यात इम्प्रूमेंट झालं. लोकसभेसारखं ऊन आज नाहीये, त्यामुळे निश्चित टक्का वाढेल. इतर राज्यांच्या तुलनेमध्ये महाराष्ट्रात महिलांची संख्या ५ ते ६ टक्केनं पुरुषांपेक्षा कमी आहे. महिला मतदान करून ही टक्केवारी भरून काढतील,'' असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

अनिल देशमुखांवरचा हल्ला म्हणजे सलीम जावेदची स्टोरी : जनतेचं प्रेम मिळतं तेव्हा, चेहऱ्यावर हास्य असतं. प्रेम मिळताना दिसून येत आहे, म्हणून त्यामुळे चेहऱ्यावर हास्य आहे, अशी मिश्कील टिप्पणी देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. तर अनिल देशमुखांवरील आरोपावर बोलताना त्यांनी जोरदार हल्लाबोल केला. अनिल देशमुख यांच्यावरील हल्ला फेक आहे, असं कालचं मी बोललो आहे. ती सलीम जावेदची स्टोरी होती, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

''बिटकॉइन संदर्भात मीडियात मी बघितलं आहे. या संदर्भात योग्य चौकशी झाली पाहिजे. काय खरं आहे हे सर्वासमोर आलं पाहिजे. आरोप खरच गंभीर आहे, गंभीर आरोपाची सखोल चौकशी होऊन त्यातून सत्य बाहेर येणं जनतेचा अधिकार आहे. विनोद तावडे संदर्भात त्यांनी कुठलेही पैसे वाटले नव्हते. त्यांच्याजवळ पैसे मिळून आलेले नाहीत. आरोप करण्यासाठी इको-सिस्टीम वापरण्यात आली. नाना पटोले, सुप्रिया सुळेंवर जे आरोप लावले, ते पूर्व आयपीएस अधिकाऱ्यांनी लावले आहेत. त्या आरोपांच्या क्लिप समोर आल्या आहेत.''

## १ लाख मताधिक्यांनी निवडून येणार, विखे पाटील यांनी व्यक्त केला विश्वास

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात आज (२० नोव्हेंबर) मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर शिर्डी विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार राधाकृष्ण विखे पाटील यांनी देखील आपल्या कुटुंबासह लोणी येथील अहिल्याबाई होळकर विद्यालयात मतदानाचा हक्क बजावलाय. विखे पाटील सात वेळा शिर्डी विधानसभेतून विजयी झाले आहेत. यंदा आठव्यांदा ते विधानसभेच्या रिंगणात आहेत. तर आपला विजय निश्चित असून राज्यात महायुतीचं सरकार चांगल्या बहुमतानं येईल, असा विश्वास विखे पाटलांनी व्यक्त केलाय.

मतदानाचा हक्क बजावल्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील महायुती सरकारवर जनतेनं विश्वास ठेवलाय. विधानसभा निवडणुकीत राज्यात महायुती सरकारला १६५ ते १७० जागा मिळणार आहेत'', असा दावा विखे पाटील यांनी केला. तसंच मागील २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेनं मला ८० हजार मतांनी निवडून दिलं होतं. यावेळी तब्बल १ लाख मतांनी निवडून येणार, असा विश्वासही यावेळी विखे पाटील यांनी व्यक्त केला.



पुढं ते म्हणाले, ''मी कोणत्याही निवडणुकीत प्रचाराची पातळी कधीच सोडली नाही. विरोधकांनी माझ्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका केली आहे. मात्र, याची दखल मी कधीच घेतली नाही. विरोधकांवर टीकाही केली नाही. निवडणूक ही विकास मुद्यांवर लढवली गेली पाहिजे. पण बाळासाहेब थोरात यांनी माझ्याविरोधात अतिशय व्यक्तिगत निवडणूक लढवली.''

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि संगमनेरचे उमेदवार बाळासाहेब थोरात यांनी देखील सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावलाय. थोरात हे जरी संगमनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करत असले तरी त्यांचं आणि त्यांच्या कुटुंबाचं मतदान विखे पाटलांच्या शिर्डी विधानसभा मतदारसंघात येतं. आज सकाळी बाळासाहेब थोरात, त्यांच्या पत्नी कांचन थोरात आणि कन्या काँग्रेस युवा तालुकाध्यक्ष जयश्री थोरात यांनी मतदान केलं.

यावेळी महाविकास आघाडीचंच सरकार येणार, असा ठाम विश्वास थोरात यांनी व्यक्त केला.

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी मादणी येथे पत्नीसह बजावला मतदानाचा अधिकार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी आज २० नोव्हेंबरला सर्वत्र सकाळी सात वाजेपासून मतदान सुरु झाल आहे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि पत्नी राजश्री जाधव यांच्या समावेत त्यांचं मूळ गाव असलेल्या मादणी येथे जाऊन मतदानाचा अधिकार बजावला आहे मादणी हे गाव बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर विधानसभा मतदारसंघात आहे .. लोकशाहीला बळकट करण्यासाठी सर्वांनीही मतदानाचा अधिकार बजावावा अस आवाहन त्यांनी मतदान केल्यानंतर केले ...




CMYK


## हवामान बदलाचे संकट

हवामान बदलाचे संकट केवळ एका देशाचे नसून, जागतिक पातळीवर त्याची तीव्रता लक्षणीय वाढली आहे. हवामान बदलाच्या घटना वारंवार घडून लागल्याने, विशेषतः विकसनशील राष्ट्रांमधील नागरिकांचे अस्तित्वच धोक्यात आले असून, भारताने तेच नेमकेपणाने विकसित राष्ट्रांना 'कॉप-२९' परिषदेत ठणकावून सांगितले, ते योग्यच! राजधानी दिल्लीतील वायू प्रदूषणात धोकादायक वाढ झाली असून, तेथील प्रदूषण हे सामान्यांसाठी किती घातक आहे, हे नुकतेच जाहीर करण्यात आले. हवामानातील तीव्र घटनांची वाढती वारंवारता तसेच त्यांची तीव्रता यामुळे सर्वसामान्यांचे, विशेषतः विकसनशील राष्ट्रांमधील नागरिकांचे अस्तित्वच धोक्यात येत आहे, हे भारताने 'कॉप-२९' या हवामानविषयक परिषदेत नुकतेच अधोरेखित केले. विकसनशील देशांमधील पर्यावरण धोरण राबविताना, विकसित देशांनी त्यांना पाठिंबा देण्याचे धोरण वाढविण्याचे आवाहन भारताने केले आहे. विकसनशील जग हवामान बदलाच्या परिणामांनी मोठ्या प्रमाणात त्रस्त असून, ते मुख्यत: विकसित देशांच्या उत्सर्जनाचा परिणाम भोगत आहेत, हे ठणकावून सांगण्यास भारताने मागेपुढे पाहिलेले नाही. हवामान बदलांमुळे विकसनशील देशांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे, हे भारताने पुन्हा-पुन्हा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सांगितले आहे. गेल्या वर्षी 'कॉप-२८' मध्ये स्वीकारण्यात आलेल्या जागतिक हवामान लवचिकतेच्या संयुक्त अरब अमिरातीच्या आराखड्यात विकसित देशांकडून वाढीव पाठिंब्याच्या तातडीच्या गरजेवर भर देण्यात आला आहे, याचेही स्मरण भारताने करून दिले आहे. 'ग्लोबल नॉर्थ' आणि 'ग्लोबल साऊथ' या दोन्ही संकल्पनांद्वारे जागतिक आर्थिक आणि पर्यावरणीय बंधने स्पष्ट केली जातात. 'ग्लोबल नॉर्थ' म्हणजे विकसित देश, ज्यात अमेरिका, युरोप, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांचा समावेश आहे, तर 'ग्लोबल साऊथ' म्हणजे विकसनशील देश, ज्यात भारत, आफ्रिका, दक्षिण अमेरिका यांचा समावेश आहे. 'ग्लोबल नॉर्थ'च्या देशांनी मोठ्या प्रमाणावर औद्योगिक विकास साधला असून, त्यामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन वाढले आहे. याचाच परिणाम म्हणून पर्यावरणीय बदलाचा फटका मुख्यतः 'ग्लोबल साऊथ'च्या देशांना बसतो. 'ग्लोबल नॉर्थ'च्या देशांनी ज्या प्रमाणात कार्बनडाय ऑक्साईड आणि इतर हरितगृह वायूंचे उत्सर्जन केले, त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढले असून विकसनशील देशांमध्ये भूकंप, पूर, गारपीट आणि वादळ यांसारख्या विपरित हवामान बदलांच्या परिणामांचा त्यांना सामोरे जावे लागते. पर्यावरणातील हे बदल, पाण्याची उपलब्धता तसेच अन्नसुरक्षा यांच्याशी थेट निगडित आहेत. पर्यावरणातील बदलांमुळे विकसनशील देशांना मोठी किंमत चुकवावी लागते. 'ग्लोबल नॉर्थ'मधील देश तेथील औद्योगिकीकरणामुळे झालेल्या आर्थिक विकासामुळे आज विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत गणले जातात. त्यांनी मोठ्या प्रमाणावर धनसंचय केला आहे. तथापि, त्यांनी पर्यावरणाला ज्यापद्धतीने अक्षरशः ओरबाडले, त्याचा परिणाम म्हणून विकसनशील देशांचे सर्वाधिक नुकसान होत आहे. या देशांना त्यासाठीचे आवश्यक ते तंत्रज्ञान तसेच आर्थिक मदतही मिळत नाही. म्हणूनच, ते बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास असमर्थ ठरतात. 'ग्लोबल साऊथ'मधील अनेक देशांमध्ये पर्यावरणीय संकटामुळे आधारभूत सुविधांचे नुकसान होते. यात जलसंपदा, शेती, आणि आरोग्य सेवा यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्याचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. तसेच, पर्यावरणीय संकटांमुळे नागरिकांचे स्थलांतर करावे लागते. यामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे. पूर किंवा दुष्काळामुळे त्यांच्या घरे, जमीन आणि जीविकेचे साधन गमवावे लागते. म्हणूनच, 'ग्लोबल नॉर्थ'च्या देशांनी त्यांच्या जबाबदार्या ओळखत, विकसनशील राष्ट्रांना मदत करणे हे गरजेचे झाले आहे. यामध्ये विकसनशील देशांना अर्थसाहाय्य करणे, तंत्रज्ञान आणि हवामान बदलांविरुद्ध ठोस उपाययोजना राबवण्यासाठी अनुदान देण्याची आवश्यकता तीव्र झाली आहे. 'ग्लोबल नॉर्थ'ने 'ग्लोबल साऊथ'मधील जे पर्यावरण बदल होत आहेत, त्यामध्ये अधिक सक्रिय तसेच जबाबदारीची भूमिका बजावण्याची ही वेळ आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था स्थिर होण्यास मदत होणार आहे. त्यासाठी हवामान वित्त पुरवठा म्हणजेच 'क्लायमेट फायनान्स' पुरवण्याची गरज आहे. पर्यावरणीय बदलांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच या बदलांच्या परिणामांचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असलेला आर्थिक पाठिंबा यालाच 'क्लायमेट फायनान्स' असे संबोधले जाते. या वित्तीय साधनांचा उपयोग विकसनशील देशांना हवामान बदलाच्या अनिष्ट परिणामांना सामोरे जाण्यासाठी होतो. यातूनच, या देशांना अद्ययावत तंत्रज्ञान, कार्यक्षमतेत सुधारणा करणे, नवीकरणीय ऊर्जा साधनांच्या विकासासाठी मदत घेणे शक्य होते. गेल्या काही दशकांमध्ये मानवी क्रियाकलापांमुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे वैश्विक तापमानात वाढ झाली असून, या तापमान वाढीमुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था या प्रामुख्याने उद्योगापेक्षा कृषी, मासेमारी आणि पर्यटन क्षेत्रांवर अवलंबून असल्यामुळे, अशा देशांना या परिणामांचा मोठा परिणाम होतो. अनेक विकसित देश त्यांच्या अर्थसंकल्पात 'क्लायमेट फायनान्स'साठी निधी मंजूर करतात. त्यासाठी ते विविध संस्थांशी करारही करतात. खासगी उद्योगांनीही यात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे. अनेक वेळा विकसनशील देशांना आवश्यक असलेला निधी उपलब्ध नसतो. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. ही प्रणाली सुयोग्य नियोजनाच्या अभावी प्रभावीपणे काम करत नाही. त्यासाठी नव्याने धोरणे आखण्याचीही गरज आहे. यातील गैरव्यवस्थापन नुकसान करणारे ठरते. म्हणूनच, त्यांची पुरेशा गांभीर्याने अंमलबजावणी व्हायला हवी. विकसनशील देश आणि विकसित देश यांच्यातील पर्यावरणीय नियमांबद्दल चढाओढ हा प्रदीर्घकाळ चालत आलेला वादाचा विषय. युरोप आणि अमेरिका यांनी काही दशकांपूर्वी मोठ्या प्रमाणावर कार्बनडाय ऑक्साईडचे उत्सर्जन केले आणि त्यामुळे हरितगृह वायूंच्या प्रमाणात वाढ झाली. विकसित देशांकडे मोठ्या प्रमाणात आर्थिक संसाधने तसेच नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यात ते मोलाची भूमिका बजावू शकतात. आर्थिक तसेच तांत्रिक मर्यादेमुळे विकसनशील देश पर्यावरणविषयक जे काही निकष आहेत, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यास असमर्थ ठरतात.

१९९७ सालच्या 'क्योटो प्रोटोकॉल'नुसार, विकसित देशांनी त्यांच्या देशांमध्ये उत्सर्जन कमी करण्याचे मान्य केले. तसेच, विकसनशील देशांना त्यापासून सूटही देण्यात आली. तथापि, त्यानंतर याबाबत एकमत होऊ शकले नव्हते. २०१५ साली झालेल्या पॅरिस करारानुसार, सर्वांनी एकत्रितपणे काम करण्यावर एकमत झाले. त्याचवेळी, विकसित देशांनी विकसनशील देशांना निधी मिळू दिला नाही. पर्यावरणातील असमतोल वाढत्या प्रदूषणास कारणीभूत ठरतो. त्यामुळे आरोग्याशी निगडित समस्याही वाढतात. पर्यावरणीय नियमांबाबत जागतिक एकमताचा अभाव ही गंभीर समस्या असून, ती हवामान बदलाच्या संकटाला तोंड देण्यात अडथळे निर्माण करणारे ठरत आहे. विकसित राष्ट्रांनी आपली नैतिक जबाबदारी लक्षात घेत, संतुलित उपाययोजना राबवायला हव्यात, तर आणि तरच हवामान बदलाच्या या आपत्तीला प्रभावीपणे तोंड देता येईल.

# बिझी मित्रांनो, आरोग्या बाबत काही नियम पाळा

वजन नियंत्रणात ठेवणे, आरोग्य चांगले ठेवणे या गोष्टी बर्‍याच अवघड असतात असे समजले जाते. काही लोक मात्र आहे त्या वजनाचेच राहतात आणि टुणटुणीत असतात. मग हे लोक असे काय करतात की, ज्यामुळे त्यांचे वजन एका ग्रॅमनेही वाढत नाही आणि त्यांच्या हालचालीत कधी जडपणा येत नाही. खरे म्हणजे स्वत:ला मेंटेन केलेल्या या लोकांनी वजन वाढू नये म्हणून काहीच केलेले नसते. त्यांचे वजन वाढण्याची शक्यताच नसते. त्याची दोन कारणे असतात. भरपूर तेलकट आणि गोड पदार्थ खाल्ले की वजन वाढत असते आणि या लोकांना तसे तेलकट आणि गोड पदार्थ खायलाच मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या वजनाचा फारसा प्रश्न येत नाही. त्यांचे वजन आपोआपच नियंत्रणात राहते.



अशा लोकांची दिनचर्या ठरलेली असते. ते कोणत्याही सार्वजनिक कामात कधी भाग घेत नाहीत. तहानभूक हरपून एखाद्या छंदाच्या मागे लागावे तर तशीही शक्यता त्यांच्या आयुष्यात नसते. त्यांचे आयुष्य सुतासारखे सरळ असल्यामुळे आणि दिनचर्या ठरलेली असल्यामुळे वेळेत जेवण, वेळेत झोप आणि योग्य तेवढे काम असा त्यांचा दिनक्रम ठरलेलाच असतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यात बिघाड होण्याचे काही कारणच नसते. मात्र ज्या लोकांना भरपूर काम असते, खूप व्याप मागे असतात आणि त्यामुळे ज्यांना वेळेवर जेवायला मिळत नाही, पुरेशी झोप मिळत नाही त्यांच्या आरोग्याला मात्र धोका असतो.

मग आरोग्य सांभाळावे की व्याप सांभाळावेत, असा प्रश्न त्यांना पडतो. पण त्यांचे व्याप त्यांना गप्प बसू देत नाहीत. म्हणून अशा लोकांना व्यापातूनही आरोग्य कसे सांभाळावे याच्या काही टिप्स् देण्याची गरज असते. अशा लोकांनी खाणे आणि व्यायाम यांच्याबाबतीतली शिस्त पाळण्याची फार गरज असते. मात्र त्यांना वेळेवर व्यायाम करायला सवड मिळत नाही आणि कधी खावे, काय खावे आणि किती खावे यावर त्यांचे नियंत्रण नसते.

असे असले तरी त्यांना काही गोष्टी आवर्जून करता येतात. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे ब्रेकफास्ट न टाळणे, जेवणात आणि न्याहारीमध्ये द्विदल धान्यांचा वापर करणे. रोज सकाळी मॉर्निंग वॉक घेता आला नाही तरी शक्य तेवढे चालणे, मोठ्या इमारतीच्या पायर्‍या शक्यतोवर चढणे अशा गोष्टी त्यांच्या हातात असतात. आपल्याला वेळेवर व्यायाम आणि खाणे शक्य होत नाही म्हणून या दोन गोष्टी पूर्णपणे सोडून दिल्याच पाहिजेत असे नाही. त्यांच्या बाबतीत आपण जाता जाता काही पथ्ये तारतम्याने पाळू शकतो आणि आरोग्य राखू शकतो.

## पावसाळ्यात स्वत:ला ठेवा हेल्दी

पावसाला नुकतीच दमदार सुरूवात झाली आहे. पावसाळा हा ऋतू सर्वांच्याच आवडीचा आहे. सहाजिकच पावसाला सुरूवात झाली की पावसात भिजण्याचे आणि पावसाळी पिकनिकचे वेध अनेकांना लागतात. मात्र पावसाळ्यात हवामानातील आर्द्रता अधिक प्रमाणात वाढते. ज्यामुळे हे वातावरण जीवजंतूसाठी पोषक ठरतं. पावसात दूषित पाणी, जंतूसंसर्ग यामुळे साथीचे आजार लवकर पसरतात. पावसाळा कितीही आनंददायी असला तरी या ऋतूत आजारपण येण्याची शक्यतादेखील तितकीच वाढते. म्हणूनच घरात जर लहान मुलं अथवा वृद्ध माणसं असतील तर या दिवसांमध्ये त्यांच्या आरोग्याची काळजी अधिक घेण्याची गरज असते. यासाठीच पावसाळ्यात आजारपणापासून दूर ठेवण्यासाठी काही घरगुती उपाय नक्कीच फायद्याचे ठरू शकतात.

कोमट पाणी प्या

पावसाळ्यामध्ये हवामानामध्ये दमटपणा वाढतो. ज्यामुळे जंतूसंसर्ग लवकर होऊ शकतो. शिवाय पचनशक्ती मंदावल्याने तुम्हाला अपचन, पोटाच्या समस्या देखील जाणवू शकतात. यासाठी सोपा उपाय म्हणजे पावसाळ्यात नियमित कोमट पाणी प्या. सकाळी उठल्यावर, रात्री झोपताना आणि जेवणापूर्वी कोमट पाणी पिण्याची सवय लावा ज्यामुळे तुमचे आजारपणापासून रक्षण होईल. शिवाय शक्य असल्यास घराबाहेर पडताना पाण्याची बाटली जरूर न्या. ज्यामुळे बाहेरील दूषित पाण्याचा तुम्हाला त्रास होणार नाही.

गवती चहा अथवा आल्याचा चहा

पावसाळ्यातील थंड हवामानावर मात करण्यासाठी अनेकजण चहाचा आसरा घेतात. पाऊस पडू लागल्यावर गरमागरम, वाफाळता चहा घेण्यात एक वेगळीच मौज असते. मात्र या दिवसात वारंवार चहा घेतल्यामुळे तुम्हाला ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो. पण जर तुम्हाला चहा आवडतच असेल दिवसभरात दोन वेळा गवती चहा अथवा आल्याचा चहा घ्या.

चहामध्ये साखर आणि दूधाचा वापर कमी प्रमाणात करा. ज्यामुळे तुम्हाला सर्दी, खोकला असे आजार नक्कीच होणार नाहीत. मसाला चहासोबत तुम्ही ग्रीन टीदेखील नक्कीच घेऊ शकता.

अंघोळीच्या पाण्यात कडूलिंबाच्या पाला वापर

कडूलिंबाची पाने पाण्यात उकळून त्या पाण्याने अंघोळ केल्यास तुम्हाला कोणतेही त्वचेचे विकार होत नाहीत. पावसाळ्यात दूषित पाण्यातून चालल्यामुळे पाय अथवा इतर अवयवांवर नायटा, खरूज असे त्वचेचे विकार होण्याची शक्यता असते. शिवाय ओले कपडे बराच वेळ अंगावर राहिल्यास हे विकार बळावू शकतात. यासाठी अंघोळीच्या पाण्यात कडूलिंबाची पाने अथवा त्याचा रस टाका.

हलका आहार घ्या

पावसाळ्यात अती तळलेले, मसालेदार पदार्थ खाण्याची कितीही इच्छा झाली तरी त्याचा मोह टाळा. कारण अशा मसालेदार पदार्थांमुळे तुम्हाला पचनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे या दिवसांमध्ये मांसाहार आणि जड आहार घेण्यापेक्षा हलका आणि सात्विक आहार घेण्याचा प्रयत्न करा.

आर्युर्वेदिक धूप

पावसाळ्यात घरातील वातावरण शुद्ध ठेवण्यासाठी तुम्ही घरात आयुर्वेदिक धूप घालू शकता. कोणत्याही आयुर्वेदिक दुकानात धूपाचे साहित्य मिळते. अशा प्रकारचा धूप घरात दाखवल्यामुळे घरात डास अथवा जीवजंतूंचा प्रादूर्भाव होत नाही. घरातील खिडक्यांच्या कोपर्‍यामध्ये, बाथरूममध्ये वाटीत खडे अथवा जाडे मीठ ठेवावे. मीठामुळे घरातील वातावरण निर्जंतूक राहण्यास मदत होते. शिवाय सर्दी-खोकला झाल्यास जाड्या मीठाचा शेक घेतल्यामुळे आराम मिळतो.

बाल्कनीत असावे तुळशीचे रोप

घराच्या खिडकीत अथवा बाल्कनीमध्ये तुळशीची रोपं लावावी. भारतीय संस्कृतीत तुळशीचे झाड घरासमोर लावण्याला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. वास्तविक तुळस ही एक आयुर्वेदिक वनस्पती आहे. तुळशीचे रोप घराबाहेर लावलेले असल्यास घरातील वातावरण शूद्ध राहण्यास मदत होते. ज्यामुळे सर्दी, खोकल्यासारखे आजार कमी प्रमाणात होतात. शिवाय सर्दी खोकला झाल्यास पटकन तुळशीच्या पानांचा रस अथवा काढा घ्यावा. ज्यामुळे लवकर आराम मिळतो.

मधाचे चाटण घ्या

दररोज सकाळी एक चमचा मध आणि चिमूटभर हळदीचे चाटण नियमित घ्या. ज्यामुळे सर्दी, खोकल्याचा त्रास नक्कीच कमी होऊ शकतो. कोमट पाण्यातून नियमित मध घेतल्यास पचनसमस्या देखील कमी प्रमाणात होतात. यासाठीच पावसाळ्यात घरात मध जरूर ठेवा. लहान मुलांनादेखील तुम्ही मधाचे चाटण नक्कीच देऊ शकता.



## पाठदुखीवर सोपे व्यायाम

एकाच अवस्थेत दीर्घकाळ बसल्यामुळे पाठदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते. विशेषत: संगणकासमोर बसून काम करणार्‍या लोकांना हा त्रास अधिक संभवतो. त्यांना तर हात, खांदे, मान, पाठ यामध्ये काही ना काही तरी त्रास होण्याची शक्यता असते. विशेषत: पाठीच्या कण्याला आधार देणारे स्नायू दुखावले जाऊन किंवा आखडले जाऊन नव्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यासाठी मानेपासून माकड हाडापर्यंत सगळे स्नायू लवचिक असण्याची गरज आहे. त्यासाठी खालील व्यायाम करावेत.

१) पाठ वाकवणे - हात डोक्यापर्यंत वर करून पाठीला बाक देणे आणि हात मागे नेणे. हा व्यायाम दोन-तीन वेळा करावा. काम करताना सलगपणे एकाच अवस्थेत न बसता थोडेसे मधेच उठून शरीराला या दिशेने ताण द्यावा, त्यामुळे पाठ वाकली जाते आणि स्नायू लवचिक होतात. अशा प्रकारचा व्यायाम अधूनमधून करावा. त्याचा फायदा रक्ताच्या प्रवाहावर सुद्धा होत असतो.

२) केवळ तुमचे पाठीचेच स्नायू लवचिक असणे आवश्यक आहे असे नाही तर कमरेचे विशेषत: कटी म्हणजे पोटाच्या दोन बाजूंचे स्नायूही लवचिक असावे लागतात. त्यासाठी अर्धचक्रासन करावे. अर्धचक्रासन म्हणजे डाव्या कमरेवर डावा हात ठेवून उजवा हात कानाकडून डावीकडे वळवणे. असाच व्यायाम उजवा हात उजव्या कमरेवर ठेवून डावा हात कानाजवळून वर करून तो उजवीकडे वळवावा म्हणजे दोन्ही बाजूंनी कमरेला बाक मिळतो.

३) ताडासन - हात सरळ वर करावे आणि हातासहीत सगळ्या शरीराला वरच्या दिशेने ताण द्यावा. अशावेळी टाचावर उभे रहावे आणि जणू आपले शरीर कोणी तरी वर ओढत आहे इतका शरीराला मिळावा. त्यामुळे एका जागी बसून आखडलेले स्नायू मोकळे होतात. आपण झोपेतून उठल्याबरोबर आळस देतो. आळस देण्याच्या या क्रियेमध्ये सगळे शरीर आखडून पुन्हा सोडून देतो. आपण या आळस देण्याच्या क्रियेकडे व्यायाम म्हणून पहात नाही. परंतु त्यामुळे आपले आळसावलेले शरीर मोकळे होते याचा अनुभव मात्र आपल्याला येत असतो. तेव्हा केवळ झोपेतून उठल्यानंतरच नव्हे तर दिवसभरात कधीतरी चार-पाच वेळा आळस द्यावा. आळस देण्याच्या बाबतीत आळशीपणा करू नये.

## जसा मूड तसे चालणे

'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' असे म्हटले जाते. याचा अर्थ पूर्णपणे वेगळा आहे. म्हणजे जो माणूस जे बोलतो तसे वर्तन करतोच असे नाही. दुसर्‍याला सद्वर्तनाचा उपदेश करणारे लोक स्वत: तसे वर्तन करत नाहीत. मात्र काही लोक लोकांना जसा उपदेश करतात तसेच वागतात म्हणून तुकाराम महाराजांनी 'बोले तैसा चाले' असे म्हटले आहे. यातला चाले हा शब्द पायांनी चालण्याशी संबंधित नाही तर चाले याचा अर्थ चालचलणूक म्हणजे वागणे असा आहे. मात्र काही लोकांनी चाले याचा अर्थ पायांनी चालतो असा करून काही`ष केले आहेत.

जो जसा बोलतो तसा चालतो, त्याच्यासाठी बोले तैसा चाले अशी उक्ती विनोदाने वापरली जाते. दारूड्या माणूस अडखळत बोलतो आणि अडखळतच चालतो. म्हणजे जसा बोलतो तसाच चालतो. माणसाचे चालणे कसे असावे हे त्याच्या मन:स्थितीवरून ठरत असते. आनंदी माणूस पंजावर उड्या मारत चालतो. रागीट माणूस दणादण पाय आपटत चालतो. पायांची ही शैली त्याच्या मन:स्थितीचे दर्शन घडवते. याचा उलटा अर्थ आपण घेऊ शकतो. पाय आपटत चालणारा माणूस रागात आहे असे समजावे आणि उड्या मारत चालणारा माणूस आनंदात आहे असे समजावे.

केवळ पायावरच नव्हे तर खांदे, मान, पाठ या सगळ्यांची अवस्था चालताना जशी असते तशी ती त्याच्या मन:स्थितीवर अवलंबून असते. निराश झालेला माणूस किंवा कायमच नैराश्यवादी असणारा माणूस खांदे पाडून चालतो. अतीशय घाईला आलेला माणूस भरभर हात हलवत चालतो. त्या मानाने निवांत असलेला माणूस हातांच्या हालचाली सावकाशही करतो आणि हात फार लांबवर हलवतही नाही. कॅनडातल्या काही मानसशास्त्रज्ञांनी माणसाचे चालणे आणि त्याची मन:स्थिती यांचा संबंध असल्याचे अनेक प्रयोगातून सिद्ध करून दिले आहे.

## आयुर्वेदात वर्णिलेल्या केसांकरीता हितकर वनस्पती !



आजकाल शॅम्पू तेल कंडिशनर जेल यांचा इतका सुळसुळाट आहे. प्रत्येक कंपनी आपले प्रोडक्ट कसे चांगले याची जाहिरात करीत असते. सोशल मिडीयावरदेखील अनेक तेल शॅम्पूच्या जाहिराती वाचायला मिळत असतात.

आयुर्वेदात केसांच्या समस्यावर आभ्यंतर व बाह्य चिकित्सा सांगितली आहेत. केशाय हितं केश्यं म्हणजेच केसांना हितकर द्रव्यांचा उल्लेख आहे. यात मुख्यतः केशवर्धन करणारे वनस्पती आणि केशरंजन करणारी वनस्पती आहेत.

केस गळणे ही समस्या योग्य केसांचे पोषण होत नसल्याने उद्भवते. केसांची मुळे हलकी झाल्याने केस गळायला लागतात. अशावेळी केशवर्धन करणारी वनस्पतींचा उपयोग होतो.

दूधी, खोबरेल तेल केसांच्या मुळांना चोळून जिरविणे फायदेशीर ठरते. आवळा, गुळवेल सारख्या वनस्पती केशवर्धनाचे कार्य करतात. अकाली केस पांढरे होत असल्यास केशरंजन करणारी द्रव्ये उपयोगी ठरतात.

माका - भृंगराज तेल तसे प्रसिद्धच आहे. भृंगराज या वनस्पतीचे पर्यायी नावच केशरंजन, केश्य असे आहे यावरून केसांकरीता किती उपयोगी आहे हे लक्षात येते. उत्तम रसायन उत्तम केश्य वनस्पती भृंगराज आहे.

जास्वंद - केस गळणे, अकाली केस पांढरे होणे, चाई पडणे या विकारांवर जास्वंद तेल, लेप या रुपात लाभदायक आहे. केसांचे विकार दूर करणारे जास्वंद उत्तम केश्य वनस्पती आहे. नलिनी, आवळा, बिभितक, तिळ, गुंजा अशा अनेक वनस्पती केश्य म्हणजेच केसांकरीता हितकारी सांगितल्या आहेत. प्रकृति, वय, व्याधी कारणांचा विचार करून या वनस्पतींचा उपयोग वैद्य करीत असतात. केस विकाराची कारणे शोधून त्यानुसार द्रव्य उपाययोजना करता येते. आयुर्वेदाची सौंदर्य शास्त्राला मिळालेली ही मोठी देणगीच आहे.




# स्क्रिन टाईममुळे कमी होतेय लहान मुलांमधील प्रतिकारशक्ती...

कोरोनाची तिसरी लाट लहान मुलांसाठी धोकादायक ठरणार असल्याचं सांगितलं जातंय. अशात अनेक पालक मुलांना घराबाहेर पाठवत नाहीत. मुलं घरात कंटाळू नये यासाठी पालक त्याच्या हातात थेट मोबाईल देऊन टाकतात. यामुळे घरात बसलेल्या मुलांना अतिमोबाईलच्या वापराची सवय लागली आहे. मात्र पालकांनो तुम्हाला माहिती आहे का जास्त स्क्रिन टाईममुळे मुलांची प्रतिकारशक्ती कमी होतेय...पहा काय आहे लहान मुलांमध्ये मोबाईल आणि कोरोनाचा संबंध.

मोबाईलच्या वापरामुळे लहान मुलांचं हृदय, किडन्या, मेंदू तसंच पचन शक्तीवर परिणाम होतो. मुलं एकाच ठिकाणी बसून मोबाईल पाहतात. त्यामुळे त्यांच्या शरीराची हालचाल कमी होते. त्यातून लठ्ठपणा वाढतो, पचनशक्ती कमकुवत होते. मुलांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यामुळं कोरोनाचा संसर्ग होण्याचा धोका वाढतो.

यासंदर्भात माहिती देताना बालरोगतज्ज्ञ डॉ. अभिनय दरवडे



म्हणाले, स्थूलता वाढणं, वजन वाढू लागणं, मेदयुक्त पदार्थ त्यावेळी खावेसे वाटणं याचमध्ये स्क्रिन बराच वेळ पाहणं, डोकेदुखी या सर्वांमुळे प्रतिकारशक्तीचा ऱ्हास होतोय. त्यामुळे मुलांच्या स्क्रिन टाईमकडे पालकांनी लक्ष देणं गरजेचं आहे.

डॉ. दरवडे पुढे म्हणाले, मुलांना टाईमपास म्हणून मोबाईल देण्यात येतो त्या मोबाईलच्या आहारी मुलांना न जाऊ देता पालकांनी मुलांसोबत वेळ घालवला पाहिजे. मुलांसोबत पालकांनी खेळणं पाहिजे यामुळे लहान मुलं स्क्रिन टाईमपासून वाचू शकतील.

मुलांची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काय करावं?

मुलांचा आहार व्यवस्थित ठेवा

विविध जीवनसत्व असलेले पदार्थ खायला द्या

जंक फूड टाळा

मुलांबरोबर वेळ घालवा, त्यांच्यासोबत खेळा

रोगप्रतिकारक शक्ती बाजारातून विकत घेता येत नाही, ती मुलांमध्ये निर्माण व्हावी लागते. त्यामुळे मुलांच्या हाती जास्त मोबाईल नको. त्यापेक्षा मुलं तंदुरुस्त कशी राहतील, याकडे पालकांनी लक्ष द्यावं.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# तिरंगी लढतीत कोण मारणार बाजी ; तर्क वितर्कांना उधाण

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर :** मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी विरुद्ध महायुती व वंचित बहुजन आघाडी असे तिरंगी लढत झाली असून यामध्ये आता कोण बाजी मारणार याबाबत मतदारसंघात तर्क वितर्क लावले जात आहेत. आमदार संजय रायमुलकर, सिद्धार्थ खरात व डॉ.सौ.ऋतुजा चव्हाण यांनी संपूर्ण ताकतीनिशी निवडणूक लढविली आहे. मेहकर मतदार संघात मतदान केंद्रावर निवडणूक प्रक्रिया पार पडली असून आता मतदार हे कोणाच्या पारड्यात आपले मतदान रुपी आशीर्वाद टाकतात. याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे. मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघ सुरुवातीपासूनच चर्चेत राहिला असून विद्यमान आमदार संजय रायमुलकर व केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रचारात ओढी घेतल्याने या मतदारसंघात महायुतीने आपली बाजू भक्कम केली होती.





त्याचबरोबर महायुतीतील इतर घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या व कार्यकर्त्यांच्या बळावर आमदार संजय रायमुलकर यांनी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढून प्रत्येक मत आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला. तर महाविकास आघाडी कडून उच्च विद्याविभूषित मंत्रिमंडळात सहसचिव पदावर प्रशासकीय दीर्घ सेवा देणारे सिद्धार्थ खरात यांना मेहकर मतदार संघात शिवसेनेकडून उमेदवारी देत विद्यमान आमदाराला राजकीय लढत देणारा तगडा उमेदवार उभा केला होता. सिद्धार्थ खरात यांनी महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व मतदारांच्या बळावर आमदार संजय रायमुलकर यांना शेवटपर्यंत लढत दिली. तर वंचित बहुजन तर आघाडीकडून उच्च विद्याविभूषित डॉ. सौ. ऋतुजा ऋषभ चव्हाण विधानसभेचे मैदानात उतरवून एरवी दुरंगी होणारी लढत तिरंगी लढतीमध्ये परावर्तित केली. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार ऋतुजा चव्हाण यांच्यासह त्यांच्या पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करीत प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून शेवटपर्यंत लढत कायम ठेवली. त्यामुळे आता मतदारसंघात कोण बाजी मारणार याबाबत तर्क वितर्क लावले जात आहेत. या तिरंगी लढतीमध्ये मतदार आपले आशीर्वाद रुपी मत कोणाच्या पारड्यात टाकले. त्यामुळे कोणाच्या गळ्यात विजयाची माळ घातली जाणार हे निकालानंतर स्पष्ट होणार असून उमेदवाराचे मात्र काउंट डाऊन सुरू झालेले आहे.

## तब्बल १९ उमेदवारांनी अजमावले नशीब

मेहकर लोणार मतदार संघात महायुती महाविकास आघाडी वंचित बहुजन आघाडी यासह इतर पक्षाच्या व अपक्ष अशा तब्बल १९ उमेदवारांनी विधानसभा निवडणुकीमध्ये आमदार होण्यासाठी आपले नशीब आजमावले आहे. यातील प्रमुख लढत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी व वंचित बहुजन आघाडी मध्ये झाली असून अपक्षांनी सुद्धा आपले संपूर्ण ताकत पणाला लावून मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला अपक्ष मतदार आता किती मते खातात आणि ते कोणाच्या पथ्यावर पडतात.हे मात्र निकालानंतर स्पष्ट होणार आहे.






देविदास खनपटे
मुख्य संपादक

## विविध वृत्त...

### आधी धक्काबुक्की केली, मग कानशिलात लगावली..., शरद पवारांच्या नेत्याला बीडमध्ये बेदम चोपलं

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** परळी मतदारसंघात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या मतदार संघात शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्याला बेदम चोपल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर आता धनंजय मुंडेंच्या कार्यकर्त्यांनी ही मारहाण केल्याचा आरोप होत आहे. कारण माराहाणीनंतर कार्यकर्त्यांनी धनंजय मुंडे यांच्या नावाच्या घोषणा दिल्या होत्या.या घटनेचा व्हिडिओ देखील व्हायरल होत आहे.

बीडच्या परळी मतदार संघात बोगस मतदान होत असल्याची माहिती शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्याला मिळाली होती.यानंतर शरद पवार गटाचे नेते माधव जाधव हे परळी मतदार संघात बोगस मतदान रोखण्यासाठी गेले होते. मात्र माधव जाधव यांना मारहाण झाल्याची घटना घडली आहे. या संदर्भातला व्हिडिओ देखील व्हायरल होत आहे.

व्हायरल व्हिडिओत तुम्ही एक अज्ञात व्यक्ती माधव जाधव यांच्या थेट आंगावर येतो आणि त्यांना धक्काबुक्की करत कानशिलात लगावतो. यानंतर इतर कार्यकर्ते देखील माधव जाधव यांना बेदम चोप देतात. त्यानंतर कार्यकर्ते माधव जाधव यांना मतदार संघातून हाकलून लावातात.

दरम्यान परळी मतदार संघात राष्ट्रवादी विरूद्ध राष्ट्रवादी अशी लढत होतेय. परळीतून अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार धनंजय मुंडे आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यात थेट लढत होत आहे.आता या मतदार संघातून कोण बाजी मारतो? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### सचिन तेंडूलकरने कुटूंबासोबत केलं मतदान, वोटिंगनंतर मास्टर ब्लास्टर म्हणाला...

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आज महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडत आहे. बुधवारी म्हणजेच मतदानादिवशी सकाळी महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, पत्नी अंजली तेंडूलकर आणि मुलगी सारा तेंडुलकरसह मतदानासाठी बुथवर पोहोचले. यावेळी तिघांनीही संपूर्ण प्रक्रियेचं पालन करून मतदान केलं. मतदानानंतर सचिन, अंजली आणि सारा यांनीही शाई लावलेल्या बोटांना दाखवलं. त्याचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला आहे. मतदान झाल्यानंतर सचिनने सर्वांना मतदान करण्याचं आवाहन देखील केलंय.



सचिन तेंडुलकर मतदान करण्यासाठी मुंबईतील वांद्रे पश्चिम केंद्रावर पोहोचला होता. त्यावेळी सचिनने सर्वांना घराबाहेर पडून मतदान करण्याचं आवाहन केलं. 'गेल्या काही काळापासून मी भारतीय निवडणूक आयोगाचं प्रतिक आहे. त्यामुळे मतदान करा हा मेसेज मी देत आहे. मतदान करणं ही नक्कीच आपली जबाबदारी आहे. मी सर्वांना आवाहन करतो की बाहेर या आणि मतदान करा', असं सचिन तेंडूलकर म्हणाला.

सचिन तेंडुलकर हा निवडणूक आयोगाचा 'नॅशनल आयकॉन' आहे. सचिन तेंडुलकर व्यतिरिक्त, अनेक बॉलिवूड कलाकार आणि चित्रपट निर्मात्यांनी देखील आज सकाळी मुंबईत मतदान केलं. निवडणुकीनिमित्त अनेक मतदार आज लोकशाहीचा उत्सव साजरा करताना दिसत आहे. त्यामुळे यंदा वोटिंगची टक्केवारी वाढणार का? हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरेल.

## बुलढाण्यात तृतीयपंथींनी देखील बजावला मतदानाचा हक्क

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** निवडणुक आयोगाने तृतीयपंथी मतदारांची स्वतंत्र नोंदणी करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे त्यांना मतदान करण्याचा हक्क मिळाला आहे. बुलढाणा जिल्ह्यात विधान सभा निवडणुकीत ३८ तृतीय पंथी मतदार आहे. सर्वाधिक १६ मतदार हे बुलढाणा विधानसभा मतदारसंघात आहेत तर सहा मलकापूर,२ चिखली,१ सिंदखेडराजा, ४ मेहकर ५ खामगाव, आणि ४ जळगाव जामोद मतदारसंघात मतदार आहेत.शुभम भास्कर मोरे या तृतीयपंथीय मतदाराने शिवाजी महाविद्यालयातील मतदान केंद्रात मतदानाचा हक्क बजावला. यापूर्वी पहिल्यांदा लोकसभा निवडणुकीत मतदान केलं होतं आणि आता दुसऱ्यांदा विधानसभेच्या निवडणुकीत मतदान केलं आहे. आम्हाला मतदान करण्याचा हक्क मिळाला आहे. त्यामुळे आनंद त्यांच्या चेहऱ्यावरदिसूनआला.



## मतदान चुकवायचं नाही! अभिनेता सुबोध भावेंचं आवाहन, राहुल देशापांडेंनी बजावला हक्क

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यभरात विधानसभा निवडणुकीसाठी आज सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे अनेक मतदान केंद्रांवर सकाळ पासूनच गर्दी पाहायला मिळत आहे. मराठी सिनेसृष्टीतील अनेक कलाकारांनी देखील सकाळीच आपला हक्क बजावला. लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होत अभिनेते सुबोध भावे, गायक राहुल देशपांडे यांनी सपत्नीक पुण्यातील मतदान केंद्रात जाऊन मतदान केले.

## वरळीत तुफान राडा!

### शिंदेंच्या कार्यकर्त्याला मनसैनिकांनी चोप चोपला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात आज विधानसमेच्या २८८ जागांसाठी मतदान पार पडतेय. या मतदानाच्याच दिवशी वरळीत तुफान राडा झालाय. वरळीत मनसेचे कार्यकर्ते आणि मुख्यमंत्री शिंदेंच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची आणि धक्काबुक्की होऊन तुफान राडा झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये मनसैनिकांनी शिंदेंच्या कार्यकर्त्याला धु धु धुतलाय. या राड्यामागच कारण एक व्हायरल पत्र ठरलंय. या प्रकरणी वरळी विधानसभेचे उमेदवार संदिप देशपांडे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.

वरळी मतदार संघात एक पत्र व्हायरल होत आहे.शिंदे गटाचा कार्यकर्ता हे पत्र व्हायरल करत असल्याचा आरोप मनसेचा आहे. या पत्रात शिंदे गटाचे उमेदवार यांना राज ठाकरे पांठिबा देत असल्याची माहिती देण्यात आली आहे. मात्र हे पत्र बनावट असल्याचे संदीप देशपांडे यांनी सांगितले आहे. तसेच या प्रकरणी संदीप देशपांडे आग्रापाडा पोलिस ठाणे गाठले असून ते तक्रार दाखल करणार आहेत.

दरम्यान शिवसेनेच्या उमेदवाराला मनसेचा पाठिंबा असे फेकपत्र वरळीमधील शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी वरळी मध्ये वाटप केल्यामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना धक्काबुक्की केली आहे. त्याचसोबत या घटनेचा त्याला जाब देखील विचारला आहे. या घटनेने वरळी विधानसभा मतदार संघात तणाव निर्माण झाला आहे.

पराभवाच्या भीतीने विरोधकांनी वरळीत अपप्रचार सुरु केला आहे, असा आरोप आता संदीप देशपांडे यांनी शिंदेंच्या शिवसेनेवर केला आहे.

शिंदे गटाला माहिममध्ये कुठलाही पाठिंबा दिला नाही. आणि माहिममधून पाठिंबा दिल्याचे कोणतेही पत्रक काढले नसल्याचे राज ठाकरे यांनी माध्यमांना सांगितलं आहे.

## एका मतासाठी काहीही... VOTE करायला मतदान केंद्रावर अशी पोहोचली जुई गडकरी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज २० नोव्हेंबर रोजी मतदानाला सुरुवात झाली आहे. सर्वजण आपला मतदानाचा हक्क बजावताना दिसत आहेत. सकाळपासून बऱ्याच कलाकारांनीही आपला मतदानाचा हक्क बजावलेला पाहायला मिळत आहे. वोट केल्याचा फोटोही कलाकारांनी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केले आहेत. अशातच मराठी अभिनेत्री जुई गडकरीने एक मत करण्यासाठी ती मतदान केंद्रावर कशी पोहोचली याविषयी पोस्ट शेअर केली. ही पोस्ट सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

जुई गडकरीने तिचा मतदानाचा हक्क बजावला. वोट करण्यासाठी ती मतदान केंद्रावर कशी पोहोचली याविषयी तिने सांगितले. एक मतही खूप महत्त्वाचे आहे असाही सल्ला तिने यावेळी दिला.



जुईने वोट केल्याचा फोटो शेअर केला. या फोटोसोबत तिने कॅप्शनमध्ये वोट करण्यासाठी केलेला प्रवास सांगितला. जुई मुंबईतून कर्जतला गेली. नंतर कर्जत ते मढ आयलंडला सेटवर पोहोचली. यासाठी तिने पहिल्यांदा ट्रेन पकडली मग ती मेट्रोने गेली आणि नंतर ऑटो पकडली. त्यानंतर जेटीने प्रवास करत पुन्हा रिक्षा घेऊन ती सेटवर पोहोचली. 'हे सगळं फक्त एका मतासाठी. एका मताने फरक पडतो. जा आणि मतदान करा' असं जुईने म्हटलं.

दरम्यान, जुईने सोशल मीडियावर ही पोस्ट शेअर करताच व्हायरल झाली. तिच्या या पोस्टवर भरपूर कमेंट येत आहेत. अनेकांनी जुईचे कौतुक केले. काम आणि वैयक्तिक आयुष्य चांगले मॅनेज करते असेही म्हटले, एक मत कर्जतच्या भविष्यासाठी, आदर्श नागरिक, अशा अनेक कमेंट करत लोकांनी जुईवर कौतुकांचा वर्षाव केला.

## मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून आ. रायमुलकर यांचे ॲडव्हान्स मध्ये अभिनंदन !

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघासाठी दिनांक २० नोव्हेंबर रोजी झालेल्या मतदान प्रक्रियेत ६४.७६% मतदान झाले असून निकाल लागण्या आधीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मेहकर मतदार संघाचे आ. संजय रायमुलकर यांचे ॲडव्हान्स मध्येच अभिनंदन करण्यात आले आहे.त्यामुळे मेहकर विधानसभा मतदारसंघात आमदार संजय रायमुलकर यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि आमदार संजय रायमुलकर मेहकर मतदार संघाच्या विविध



भागात फिरून मतदान प्रक्रियेची पाहणी, कार्यकर्त्यांच्या भेटी घेत होते. महायुतीचे उमेदवार आमदार संजय रायमुलकर मोळा, शेंदला, सावत्रा ,कळंबेश्र्वर, थार अशा गावांच्या मतदान केंद्रांना भेटी देत पेनटाकळी येथे आले असता मुंबई येथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आज दुपारी ४ वाजता दरम्यान आमदार संजय रायमुलकर यांच्या भ्रमणध्वनीवर कॉल आला. कसे काय सुरू आहे संजय,मतदानाची टक्केवारी किती आहे, आपण निश्चित सत्तेत येणार आहोत, राज्यात सगळीकडे वातावरण अनुकूल आहे. तुझे खूप खूप अभिनंदन,असे म्हणून मुख्यमंत्री शिंदे यांनी आमदार संजय रायमुलकर यांचे ॲडव्हान्स मध्येच अभिनंदन केले.अतिशय व्यस्त कार्यक्रमातून मुख्यमंत्री शिंदे यांनी वेळ



काढून आठवणीने आमदार रायमुलकर यांना भ्रमणध्वनी वरून कॉल केला आणि विजयाच्या ॲडव्हान्स मध्ये शुभेच्छा दिल्या. त्यामुळे आमदार संजय रायमुलकर यांचा विजय निश्चित मानला जात असून महायुतीची पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये मात्र चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.